दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार
• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • शुक्रवार दि.२७ मार्च २०२६ • अंक-७४ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

## अशोक खरातचा एन्काउंटर होऊ शकतो

**मुंबई**–सत्तेमध्ये सहभागी असणाऱ्या लोकांना वाचवणे हे मुख्यमंत्री करणारच. खरातच्या ट्रस्टला जयकुमार रावलच्या विभागाने पैसे दिले. हे सरकार सोयीच्या गोष्टी पुढे आणते, काही दाबून ठेवते, या प्रकरणात अनेकांनी हातू धुतले आहे. या चौकशीत काही पुढे येईल असे वाटत नाही, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, रुपाली चाकणकर यांचे प्रदेशाध्यक्षपद जो पर्यंत तटकरे म्हणत नाही तो पर्यंत काढले जाणार नाही. तटकरेंच्या मनात येईल त्या दिवशी तो निर्णय घेतला जाईल. रुपाली चाकणकर यांचे नाव जेव्हा पुढे आले त्यावेळी तटकरे यांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रवादीवर ताबा असलेले तटकरे आणि पटेल हे राष्ट्रवादीत निर्णय घेतात.

# आखाती युद्धाचे थेट परिणाम सर्वत्र

## खांदा कॉलनी नवीन पनवेल पश्चिम येथे गॅस सिलेंडर्ससाठी लांबच लांब रांगा .... हीच स्थिती पनवेल मध्ये सर्वत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

आखाती युद्ध सुरू होऊन आता जवळ जवळ महिना उलटून जाईल परंतु, हे युद्ध थांबण्याची चिन्ह मात्र काही दिसत नाहीत.

याचा परिणाम सर्वत्र जसा पाहायला मिळतो तसाच तो भारत देशातही पाहायला मिळत आहे . अनेक व्हिडिओ बातम्या यांच्या मार्फत याच चित्र स्पष्ट होताना आपण पहातोच आहोत . सदरचे युद्ध अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या महिना भरापासून छेडले जात असून , भारततही त्याचे दुरगामी परिणाम होण्याच्या मार्गावर असल्याचे समोर येताना दिसते आहे . सदरच्या युद्धाची झळ नवीन पनवेल रायगड मध्ये सुधा पोहोचायला लागल्याचे चित्र पहावयास मिळत आहे . नागरिकांची घरगुती गॅस सिलेंडर साठी धावाधाव व दमछाक होत असल्याचं उघड होत आहे .

खांदा कॉलनी नवीन पनवेल पश्चिम तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील आर . डी. एच.

पी . गॅस एजन्सीत गेल्या सात आठ दिवसां पासून , घरगुती गॅस साठी लांबच लांब रंग लागताना दिसून येत आहे . सरकार मात्र कुठल्याही प्रकारचा तुटवडा नसल्याचे जाहीररित्या बोंबलून सांगत आहे . मग यात किती तथ्य लोकांनी समजावे.

**आर.डी.एच.पी.गॅस एजन्सी च्या समोर गॅस धारकांची रांग दृष्टिपथात,नागरिक भेदरले ....**

खांदा कॉलनी नवीन पनवेल पश्चिम येथील आर .डी. एच. पी. या गॅस एजन्सी समोर आज तारीख २५/३/२०२६ रोजी सुधा तीस ते चाळीस गॅस धारकांची रांग निदर्शनास आल्याचं समोर येतंय ... सदरचा प्रकार गेल्या आठवड्या पासून , चालू असल्याचे गॅस धारक व नागरिकांचे म्हणणे आहे . सदरच्या प्रकारामुळे नागरिक हवालदिल झाले असून , पुढे आणखीन बिकट परिस्थिती ओढवेल का? या चिंतेने नागरिक ग्रासले आहेत.

**सरकारचा दावा फोल नागरिकांचा आरोप**

सरकार मग ते राज्य सरकार असेल, केंद्र सरकार असेल वारंवार घसा ताणून जरी जाहीर करत असेल, घोषणा करत असेल, पुष्टी करत असेल तरी , सत्य पडद्या आडून डोकावतेच

ते दृष्टीआड करता येत नाही . सरकारचा ठणकावून दावा आहे की , घरगुती गॅसचा तुटवडा नाहीच ! आणि भासणार नाही हे आश्वासन फोल ठरताना आढळत असल्याचे रहिवाशांचे संतप्त म्हणणे आहे.



### मुख्यमंत्र्यांची ग्वाही सुधा हवेतच का?

**कालपरवा काही व्हिडिओ प्रसिद्ध झालेत त्यात आपल्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी पूर्ण जबाबदारीने विधान केले आहे की , कुठल्याही प्रकारचा तुटवडा घरगुती सिलेंडरचा जाणवणार नाही . अशा आशयाची हमी त्यांनी त्या ठिकाणी दिलेली आहे . काही इतर राजकारणी कारण नसताना वावड्या उठवत आहेत असेही बोलल जातं आहे . मग त्यात काही तथ्य आहे का? असे लोकांचे गाऱ्हाणे आहे.**

### पंचवीस दिवसांनी एक सिलेंडर मिळणार ! लोकांचे धाबे दणाणले

**दरम्यान या सगळ्या परिसराच्या पार्श्वभूमीवर बघितल्यास आता आखाती देशातून होणाऱ्या अपुऱ्या वायू पुरवठ्याच्या संदर्भाने एकवीस ते पंचवीस दिवसांनी सिलेंडर मिळणार असल्यामुळे ज्यांच्या घरात वायूचा जास्त प्रमाणात खप आहे अशा कुटुंबांना अडचणीचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे अशी कुटुंबे ज्यांच्याकडे सदस्यसंख्या जास्त आहे तसेच, ज्यांच्याकडे वृद्ध व दुर्धर व्याधीने ग्रस्त असे रुग्ण आहेत त्यांना याचा चांगलाच फटका बसणार आहे .त्यामुळे लोकांमध्ये संताप व चिंतेचे असे दुहेरी वातावरण निर्माण झाल्याचे सिद्ध होत आहे.**

## मुंबई जिल्हा बँक निर्मित सहकार भवनाचा आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांच्या संकल्पनेतून विक्रोळी कन्नमवार नगर येथील मुंबई हौसिंग फेडरेशन लि. संचलित सेवा, मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्राचा उदघाटन सोहळा व सायन प्रतीक्षा नगर येथील सहकार भवनाचा भूमिपूजन सोहळा उद्या शुक्रवार दिनांक २७ मार्च २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभ हस्ते सुविधा भूखंड क्र. ५, सी. एस क्र. ४ (भाग) व ५ (भाग), सॉल्ट पॅन विभाग, प्रतीक्षा नगर, सायन, येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. प्रवीण दरेकर असणार आहेत. या सोहळ्याला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर, मुंबईच्या महापौर रितू तावडे,भाजपा मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, आ. तमील सेलवन, शिवसेना माजी खासदार राहुल शेवाळे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष विद्याधर अनास्कर, म्हाडा उपाध्यक्ष संजीव जैस्वाल, म्हाडा मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, झोपू प्राधिकरणाचे मुख्य अधिकारी महेंद्र कल्याणकर, म्हाडाचे मुख्याधिकारी मिलिंद शंभरकर उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई बँकेचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव नलावडे, संचालक आ. प्रसाद लाड, आ. सुनिल राऊत, नंदकुमार काटकर उपस्थित राहणार असल्याची माहिती मुंबई बँकेचे उपाध्यक्ष आणि निमंत्रक सिद्धार्थ कांबळे, नगरसेवक आणि मुंबई हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर यांनी दिली.

## पूण्यातील सहाय्यक दुय्यम निबंधकार्यालयांचा कारभारात सर्वात जास्त हवेली सहाचा अनागोंदी कारभार?

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुण्यात सहाय्यक निबंधक कार्यालयातील प्रकार पुढे येत असतांनाच यात लोणी काळभोर दुय्यम सहाय्यक निबंधक सहा कार्यालयात अनेक प्रकारचा अनागोंदी कारभार सूरू या कार्यालयाला आणि अधिका-यासह कर्मचा-यांना भुमाफिया आणि गूंड प्रवृत्तीने घेरलेले आहे यात या कार्यालयाचे अधिकारी दबावाखाली कामे करत असल्या कारणाने अनेक दस्त नोंदणी दबावाखाली होत आहे यात भूमाफियांचा आणि गूंड प्रवृत्तीचा दबाव या कार्यालयात अंतर्गत हडपसर,लोणी काळभोर,चंदननगर आणि ईतर ठिकाणचे गुंठेवारी,तूकडे बंदी आणि तांत्रीक कारणाने नोंदणी पात्र नसलेले दस्त सर्रासपणे नोंदणी केली जात असल्याचा प्रकार पुढे येत आहे एकतर या ठिकाणी सीसीटिव्ही नियमानूसार नाही त्यामूळे अधिका-यांच्या मर्जीतील ठराविक एजंट आणि सहाय्यक दुय्यम निबंधक




यांच्या लाखो रूपयांचा छुप्या पध्दतीने अर्थपूर्ण कारभार होत आहे या व्यवहारातून अनेक प्रकारची गैरप्रकारची दस्त नोंदणी नोंदवली जात आहे ज्या जमिनी खरेदी - विक्रीवर कायदेशीर बंदी आहे यात गुंठेवारी,तुकडेबंदी,सरकारी जमीनी,लिजवर दिलेल्या जमीनी , वादविवादांच्या जमिनी , दडपणाखाली दस्त नोंदणी अशा बोगस नोंदणी महानिरिक्षक आणि जिल्हा निबंधकांनी वेळोवेळी परिपत्रके काढून बोगस नोंदणी थांबविण्याचे आदेश दिलेले असतांनाही याबाबत दुय्यम निरिक्षक या आदेशाची पायामल्ली करत आहे गेल्या दोन वर्षांत हवेली सहाय्यक दुय्यम निबंधक सहा यांनी या काळात नोंदणी झालेल्या दस्त नोंदणीची उच्च स्तरिय तपासणी करण्यात यावी प्रत्येक बोगस दस्त नोंदणी मागे लाखांच्या घरात व्यवहार झालेल्यांची चर्चा आहे भूमाफिया आणि गूंडांना हाताशी धरून दस्त नोंदणी केली जात आहे या ठिकाणी रेडीरेकनर आणि तूकडे बंदी,सरकारी लिजवर दिलेल्या जमिनी , वादविवादाच्या जागा ,दडपणाखाली दस्त नोंदणी यात नियमांचे सरळ उल्लंघन केले जात आहे अनेक दस्तामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण - घेवाण तसेच बोगस दस्त नोंदणी असल्याची चर्चा आहे या कार्यकाळात सर्व दस्तांची व एडीएम ठेवण्यात आलेल्या सर्व दस्तांची उच्च स्तरिय चौकशी करण्यात यावी

( हवेली क्रमांक सहा सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालयाचा भुमाफिया, गुडांचा सहभाग यांचा दिनांक २६ फेब्रुवारीला २०२६ रोजी सहा ते सात जणांची दस्त नोंदणी झाली यांना आज पर्यंत चेक आणि नगदी मिळाले नाही आणि यात दुय्यम निबंधकांनी त्रियस्त मार्फत असे पैसे जमविले आणि रोज होणा-या दस्त नोंदणीत पैसे कोण वसूल करतो याचे सविस्तर वृत्त पूराव्यासह पूढिल भागात )

# वाशीगाव येथे श्रीरामनमवी निमित्त विविध दिवसभरात उपक्रमांचे आयोजन

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वाशीगाव येथील स्व. प्रेमनाथ पाटील चौकातील प्रभाग क्र. १८ च्या भारतीय जनता पार्टी मुख्य जनसंपर्क कार्यालयात श्रीरामनवमी निमित्ताने दिवसभरात विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.नगरसेवक निशांत भगत, नगरसेविका सौ प्रिती संदीप भगत व समाजसेवक संदीप करसन भगत यांनी सकाळी प्रभागातील कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत प्रभु श्रीरामांच्या प्रतिमेचे पुजन केले, यावेळी परिसरात प्रभु रामरायांच्या जयघोषाने चैतन्य निर्माण झाले होते.सायंकाळच्या सत्रात वाशीगाव येथील नगरसेवक जनसंपर्क कार्यालयाजवळ हिंदू संमेलन समिति, वाशीगाव आयोजित हिंदू व हिंदुत्वासह





संघ यात्रा या विषयावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ठाणे विभागाचे सेवाप्रमुख श्री.अविनाश गव्हाणे यांचे तर संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानाच्या प्रांत कार्यकारिणी सदस्या श्रीमती शितल निकम यांचे स्वदेशी, पर्यावरण, समरसता, नागरिक अनुशासन आणि कुटुंब प्रबोधन या पाच विषयांवरील पंचपरिवर्तन या विषयानीत मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले, या हिंदू संमेलनात उपमहापौर दशरथ भगत हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते असे हिंदू संमेलन समिती अध्यक्ष भारत भगत यांनी कळविले.विश्व हिंदू परिषद व बजरंग दल, वाशी प्रखंड आयोजित श्रीरामनमवी निमित्त भव्य शोभारात्रेचे स्वागत वाशीगाव येथे उपमहापौर दशरथ भगत, भाजपा नगरसेवक निशांत, नगरसेविका सौ.प्रिती संदीप भगत, माजी नगरसेविका श्रीमती फशीबाई भगत, सौ वैजयंती व सौ. रुपाली निशांत भगत यांनी स्वागत देखील केले.

# उरणच्या यशश्री शिंदे प्रकरणात न्यायाचा एक टप्पा; ८ लाख मदत व शासकीय नोकरी जाहीर

## यशश्री शिंदे प्रकरणात आरोपीला लवकर शिक्षा द्या; उरण आरपीआय आक्रमक

**उरण । प्रतिनिधी**

उरण मध्ये यशश्री शिंदे हत्येनंतर केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री तथा आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्यासमवेत आरपीआय नेते प्रकाश मोरे, नरेंद्र गायकवाड व रायगड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते व स्थानिक आरपीआय नेते संजय गायकवाड यांनी पीडितेच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली होती. त्यावेळी कुटुंबाची परिस्थिती पाहून त्यांनी शासकीय नोकरी व आर्थिक मदत देण्याची घोषणा केली





होती.दिलेला शब्द पाळत पीडित कुटुंबाला सुमारे ८ लाखांची आर्थिक मदत तसेच शासकीय नोकरी लाभार्थी मानून अनुष्का शिंदे हिला देण्यात आली आहे. सदर नोकरीचे परिपत्रक रामदास आठवले यांच्या उपस्थितीत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २० मार्च २०२६ रोजी 'चवदार तळे सत्याग्रह दिना'च्या औचित्याने विजय स्तंभ येथे नोकरीचे परिपत्रक प्रदान करण्यात आले.पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे नेते रामदास आठवले व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुका अध्यक्ष संजय गायकवाड व स्थानिक कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने कुटुंबियांनी आभार व्यक्त केले.या नोकरीसाठी जिल्हाधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी विशेष सहकार्य केले. तसेच प्रकरणातील आरोपीविरुद्ध फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून लवकरात लवकर कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी उरण आरपीआयने केली आहे.

# जर्नलिस्ट मीडिया असोसिएशन (जेएमए) नवीन समितीची प्रदेश अध्यक्ष,महासचिव,कार्यध्यक्ष पदासाठी घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

जर्नलिस्ट मीडिया असोसिएशन(जेएमए) महाराष्ट्र राज्यासाठी नवनिर्वाचित कार्यकारी समितीची घोषणा केली आहे. २५ मार्च रोजी झालेल्या निवडणुकीनंतर, ज्येष्ठ पत्रकार संजय निराळे यांची राज्य प्रदेश अध्यक्षपदी आणि विनायक गुलगुले यांची कार्यकारी अध्यक्षपदी निवड झाली. दै लोकांकीतचे संपादक संजय पवार यांची सरचिटणीस पदी तर राजीव मोहन मिश्रा आणि श्रीमती सुचिता बिराजदार यांची राज्य सल्लागारपदी, तर पत्रकार दत्तात्रय सूर्यवंशी यांची वरिष्ठ उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. इतर कार्यकारी सदस्यांमध्ये हेमंत भास्कर, लालचंद यादव, सनी मेहरौल आणि भोलानाथ शर्मा यांची उपाध्यक्षपदी, विकास पाटील आणि मोहम्मद इरशाद शेख यांची सह-खजिनदारपदी, तर मोहम्मद कमर शाह आणि ओंकार नागवकर यांची उपसचिवपदी निवड झाली आहे. धोरणतज्ञ संजीव विश्वकर्मा आणि मुख्य सल्लागार राजीव मोहन मिश्रा यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहत निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित केली. यावेळी पत्रकार माध्यम संघटनेचे सर्व सदस्य आणि पत्रकार उपस्थित होते.पत्रकारांना सहाय्य आणि त्यांचे कल्याण हेच JMA चे उद्दिष्ट: संजय निराले



'जर्नालिस्ट मीडिया असोसिएशन'च्या (JMA) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची निवडणूक पार पडल्यानंतर, निवडणूक अधिकारी राजीव मोहन मिश्रा आणि संजीव विश्वकर्मा-यांच्यासह प्रदेश प्रभारी सुधीर शर्मा आणि निमंत्रित अतिथी अधिकारी महेश खरे (RPI चे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष)-यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शाल अर्पण करून सन्मानित केले. दरम्यान, नवनिर्वाचित अध्यक्ष संजय निराले, कार्याध्यक्ष विनायक गुलगुले आणि सरचिटणीस संजय पवार यांनी, अत्यंत शिस्तबद्ध व सुव्यवस्थित वातावरणात निवडणूक यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल JMA चे प्रभारी सुधीर शर्मा आणि निवडणूक अधिकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. JMA चे प्रदेश पदाधिकारी म्हणाले की, असंघटित क्षेत्रात कार्यरत असलेल्या पत्रकारांना संघटित करणे, त्यांच्यासमोरील आव्हाने समजून घेणे आणि त्यांना आवश्यक ते सहाय्य पुरवतानाच, तत्त्वनिष्ठ व सत्यनिष्ठ पत्रकारितेचा वसा जपण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे, हेच JMA चे मुख्य ध्येय आहे. त्यांनी पुढे ठामपणे सांगितले की, पत्रकारांची सुरक्षा, त्यांचे आर्थिक कल्याण आणि त्यांच्यासाठी शासकीय मदत मिळवून देणे, या बाबींसाठी JMA कटिबद्ध आहे; आणि याच उद्देशाने, आगामी काळात विविध उपक्रम अत्यंत नियोजित व पद्धतशीरपणे राबवण्याचा या संघटनेचा मानस आहे.पत्रकारांच्या हितासाठी कार्यरत राहणार निवडलेली समिती: सुधीर शर्मा 'जर्नलिस्ट मीडिया असोसिएशन'चे (JMA) महाराष्ट्र राज्य प्रभारी सुधीर शर्मा यांनी, संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश आणि सरचिटणीस अरुमुगम पिल्लाई यांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल व अमूल्य सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यकारिणी समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय निराले, कार्याध्यक्ष विनायक गुलगुले आणि सरचिटणीस संजय पवार यांचे अभिनंदन करताना, या नवीन कार्यसमितीच्या नेतृत्वाखाली JMA ची उद्दिष्टे नक्कीच साध्य होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य समन्वयकांनी नमूद केले की, आज महाराष्ट्रात शेकडो प्रसारमाध्यम संस्था अस्तित्वात असूनही, अनेक कार्यरत पत्रकारांना आजही अडचणींचा सामना करावा लागत आहे आणि प्रशासनाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यांना सध्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेता येत नाहीये. 'लोकशाहीचा चौथा स्तंभ' दिवसेंदिवस कमकुवत होत चालला आहे. पत्रकारांची सुरक्षा सुनिश्चित करणे, निवृत्तीवेतन धोरण लागू करणे आणि डिजिटल माध्यमांमधील व्यावसायिकांना योग्य मान्यता व सन्मान मिळवून देणे, ही आजही मोठी आव्हाने आहेत. या गंभीर समस्यांचे निराकरण करण्यात JMA ऐतिहासिक भूमिका बजावण्यास कटिबद्ध आहे.

दैनिक लोकांकीत



# विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा.आशालता कांबळे; खेडमध्ये २९ मार्चला वैचारिक मेजवानी

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त आयोजित पहिल्या कोकण विभागीय विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक आणि आंबेडकरी चळवळीतील तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्या प्रा.आशालता कांबळे यांची निवड करण्यात आली असून, साहित्यविश्वात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी, स्वागताध्यक्ष ड. तु. ल. डफळे आणि मुख्य संयोजक अनिल येसोंडे यांनी संयुक्तपणे ही घोषणा केली. २९ मार्च २०२६ रोजी खेड येथील फुले-शाहू-आंबेडकर साहित्य नगरी, स्व. मीनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्र येथे हे संमेलन पार पडणार आहे. प्रा. कांबळे यांच्या निवडीमुळे विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची परंपरा अधिक समृद्ध झाली आहे. यापूर्वी या मानाच्या यादीत बाबुराव बागुल, वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ अजिज नदाफ, आत्माराम राठोड, कॉ.तारा रेड्डी, तुलसी परब, डॉ. आ. ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ. श्रीराम गुंदेकर, विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ प्रतिभा अहिरे, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. अशोक राणा, डॉ. बी. जी. वाघ, लोकनाथ यशवंत, यांसारख्या दिग्गजांचा समावेश राहिला आहे.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कांदळगाव येथील प्रा. आशालता कांबळे या लेखिका, कवयित्री, संशोधिका, समीक्षिका, संपादिका आणि प्रभावी व्याख्यात्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी १४ हून अधिक पुस्तके लिहिली असून ४ पुस्तकांचे संपादन केले आहे. 'बहिणाबाईंची कविता : एक आकलन', 'सावित्रीबाई फुले साहित्य मीमांसा', 'आंबेडकरी आई' यांसारख्या संशोधनपर ग्रंथांबरोबरच 'रमाई एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व', 'आईची पत्रे' आणि 'दृष्टी' या नव्या पुस्तकांनी त्यांच्या साहित्यिक वाटचालीला नवे आयाम दिले आहेत. 'यशोधरेची लेक', 'लोकमाता अहिल्याबाई होळकर' आणि 'समर्थ स्त्रियांचा इतिहास' ही त्यांची विशेष गाजलेली पुस्तके आहेत.गेल्या चार



दशकांपासून त्यांनी हजारो प्रबोधनात्मक व्याख्याने देत समाज जागृतीचे कार्य सातत्याने केले आहे. राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले असून त्यांच्या साहित्याला अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'बहिणाबाईंची कविता : एक आकलन' या ग्रंथाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पुरस्कार तसेच 'प्रभाकर पाध्ये पुरस्कार' मिळाला आहे, तर 'आमची आई' या पुस्तकाला राष्ट्रीय स्तरावरील गौरव प्राप्त झाला आहे.संमेलनात सकाळच्या सत्रात सांस्कृतिक विचार यात्रा, उद्घाटन समारंभ, पँथर ज.वि. पवार यांना प्रा. अंजलीताई आंबेडकर यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार, 'धर्म, संस्कृती, संविधान आणि मराठी साहित्य' या विषयावर परिसंवाद, कवी संमेलन आणि सायंकाळी समारोप असे विविध कार्यक्रम रंगणार आहेत.संमेलनातील अध्यक्षीय भाषणातून प्रा.आशालता कांबळे विचारमंथन मांडणार असून, प्रा. प्रतिमा परदेशी यांचे उद्घाटनपर भाषण आणि प्रा. अंजलीताई आंबेडकर यांचे प्रमुख मार्गदर्शन हे संमेलनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र आणि कोकण बुद्ध धम्म संघ एज्युकेशन फाऊंडेशन, खेड यांच्या संयुक्त विद्यमाने होणारे हे संमेलन फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेला नवी ऊर्जा देणारे ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# अर्थसंकल्पात दिव्यासाठी अनेक कामांची तरतुद करावी-स्नेहा पाटील,नगरसेविका

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महानगरपालिकेच्या २०२६-२७ च्या विशेष अर्थसंकल्प सभेत नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा शहरातील अनेक महत्वाच्या कामांची मागणी करुन या कामांसाठी अर्थसंकल्पात अंतर्भाव व तरतुद करण्याची मागणी व सुचना केली. त्यात दिवा पुर्व - पश्चिमला जोडणारा उड्डाणपुल अनेक वर्षापासुन प्रलंबित असून काही जमिन हास्तांतर न झाल्यामुळे पुलाचं काम धिम्या गतीने सुरु आहे . यामुळे जमिन मालकांना योग्य तो मोबदला देऊन हास्तंतर प्रक्रिया जलदगतीने पुर्ण करावे, मुंब्रा फायर स्टेशन ते दिवा शिळ रोड रसत्याचे बांधकाम करून रस्ता खुला करण्यात यावा.



दिवा -शिळ रोडवर छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ बस स्टॉप तात्काळ बांधण्यात यावा, अनेक नाले जे शहरातुन खाडीकडे जातात त्या पाण्याचा निचरा योग्या रितीने दृष्टीने पुनर्बांधणी करणे. मच्छी मार्केटसाठी योग्य जागा नियोजित करुन मार्केट बांधणे, मलःनिसाराण योजने अंतर्गत कामे तात्काळ करणे. दिवा पश्चिमला पाणी पुरवठा करण्यासाठी पुश थ्रु जलवाहिनी तात्काळ टाकणे. प्रलंबित ठिकाणी एल.ई.डी पथदिवे लावणे व दुरुस्थ करणे. दिवा शहरासाठी एक मॅकेनिकल स्वीपर मशिनसाठी तरतुद करून सफाई कामगारांची संख्या वाढविण्यात यावी. दिवा क्षेपणभूमीवर शास्त्रेक्त पध्दतीने प्रक्रिया केली जात आहे , पण रोज रात्री या क्षेपणभुमिवर आग लागते व त्यामुळे परिसरात धुराचे लोण पसरते ज्याचा परिणाम रहिवाशांच्या आरोग्यावर होत आहे . या क्षेपणभुमीवर आणाखी चांगल्या प्रकारे प्रक्रिया कशी करता येईल याकडे लक्ष देणे. शहरातील वातावरण आरोग्यदायक करण्याचा दृष्टीनं एक पाऊल पुढे म्हणुन शहरातील मुख्य दिवा-शीळ रोड सह मुख रसत्यांवर वृक्ष लागवड करण्यासाठी तरतुद करणे. नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांनी दिवा शहरातील अनेक महत्वाच्या कामांची मागणी करुन या कामांसाठी अर्थसंकल्पात अंतर्भाव व तरतुद करण्याची मागणी व सुचना केली.

# साळींबा येथे जागतिक वन दिनानिमित्त वृक्षारोपण व जन जागृती कार्यक्रम संपन्न



**वडवणी । प्रतिनिधी**

जागतिक वन दिनानिमित्त साळींबा येथे वृक्षारोपण व जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात ग्रामपंचायत सरपंच,सदस्य,विविध मान्यवर, अधिकारी, व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

साळींबा ग्रामपंचायत अंतर्गत जागतिक वन दिनानिमित्त वृक्षारोपण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी वृक्षारोपण करण्यात आले तसेच ग्रामस्थांना वृक्षारोपण करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी एस.डी. वायभासे, श्रीमती.डी आर शिंदे वनपाल वडवणी, एल जी वरवडे वनरक्षक वडवणी, मुंडे सा.व.म.वडवणी यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व, झाडांचे मानव जीवनातील योगदान आणि वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी वृक्ष लागवडीची गरज याविषयीसविस्तर मार्गदर्शन केले . यावेळी या कार्यक्रमाला सरपंच दिनेश नाईकवाडे, युवा नेते ओमराजे जाधव, ग्रामपंचायत सदस्य रामप्रसाद चव्हाण, सदस्य आकाश कांबळे, सदस्य बाबासाहेब खाडे, बालासाहेब मायकर,यासह ग्रामस्थ ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# शिशुवर्गाच्या बालकांनी केला प्रभु रामचंद्रचा जन्मोत्सव उत्साहात साजरा

**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित शिशुविहार, चिपळूण येथे बुधवार दिनांक २५ मार्च २०२६ रोजी रामनवमी हा पवित्र सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. प्रभू श्रीरामांच्या जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या विभाग प्रमुख सौ. श्रुती रानडे मॅडम यांच्या हस्ते प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीराम जय राम जय जय राम या गजराने वातावरण भारावून टाकले. तसेच कार्यक्रमात भजन व कीर्तनाचे सादरीकरण करण्यात आले.सौ.आदिती फडणीस मॅडम यांनी श्रीरामाची संपूर्ण कथा विद्यार्थ्यांना सांगितली. रामजन्माचा सोहळा साजरा करताना



पाळणा गाऊन प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. पाळणा गात विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे आनंद व्यक्त केला, ज्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि आनंदमय झाले. लहानगे विद्यार्थी राम, सीता, लक्ष्मण आणि हनुमान यांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी सौ.मानसी नाटुस्कर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना रामनवमी सणाचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगितले. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, त्यांची कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा याबाबत सौ. श्रुती रानडे मॅडम यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला शाळेच्या विभाग प्रमुख, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त आणि भारतीय संस्कृतीबद्दल आदर निर्माण होतो. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

# दुबार मतदान लोकशीला घातक,लोकशाही टिकवायची असेल तर निवडणुकीत प्रदर्शकता आणा–दीपक निकम

**पनवेल । प्रतिनिधी**

आपल्या देशाची आदर्श लोकशाही आहे. लोकशाहीत निवडणूक प्रक्रिया ही अचूक, पारदर्शक आणि त्रुटीविरहित मतदानावर आधारित असणे अत्यावश्यक आहे. परंतु पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांमधील गंभीर त्रुटी, दुबार नावे, चुकीचे प्रभागनिहाय स्थलांतर व दुहेरी मतदान हे लोकशाहीला घातक आहे. निवडणूक प्रक्रियेच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तेव्हा निवडणूक प्रक्रिया पारदर्शक करायची असेल तर तातडीने विशेष पडताळणी मोहीम हाती घेऊन यादीतील गंभीर त्रुटी निकालात काढाव्यात अशी मागणी शिवसेना पनवेल विधानसभा संघटक ( उबाठा ) दीपक निकम यांनी प्रांत अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाने केली आहे.पनवेल विधानसभा मतदारसंघात हजारो मतदारांची नावे दुबार असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. ठशाीशिीशपींरींळेप`ष ींहश झशेश्रिश – लीं, १९५० मधील कलम १७ नुसार कोणत्याही व्यक्तीचे नाव एका पेक्षा अधिक मतदारसंघात नोंदवता येत नाही, तसेच कलम १८ नुसार एका मतदारसंघातही एकापेक्षा अधिक ठिकाणी नाव असणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य नाही. अशा नोंदी मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. त्यामुळे संबंधित विभागाची पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे राबविली जात नाही असेच समोर येते.

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे त्यांच्या वास्तव निवास स्थानाशी विसंगत प्रभागांमध्ये नोंद झाल्याचे आढळून आल्या आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल नोंदणी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापराच्या युगात अशी प्राथमिक पातळीवरील प्रशासकीय त्रुटी अस्वीकार्य आहेत. पनवेल परिसरात घाटमाथा, कोकण, दक्षिण भारतीय व उत्तर भारतीय नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. त्यापैकी अनेक मतदारांची नावे त्यांच्या मूळ गावच्या मतदार यादीत कायम असून, त्याचवेळी पनवेल विधानसभा मतदारसंघातही नोंद असल्याची शक्यता नाकारता येत नाही. Election Commission of India च्या मार्गदर्शक सूचनांनुसार अशी दुहेरी नोंद तत्काळ शोधून वगळणे आवश्यक आहे, अन्यथा दुहेरी मतदानाची शक्यता लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचवू शकते.

मतदार यादीतील या गंभीर घोळाबाबत केवळ नागरिकांनी तक्रारी नोंदवाव्यात आणि त्यानंतर विभागाने दुरुस्ती करावी, ही भूमिका पुरेशी नाही. निवडणूक प्रशासनाने स्वतंत्र विशेष यंत्रणा निर्माण करून धराधर पडताळणी, दस्ताऐवज तपासणी, दुबार नावे शोथ मोहीम, मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि चुकीच्या प्रभागातील नोंदी दुरुस्त करणे अशी व्यापक मोहीम राबविणे आवश्यक आहे. बैठका या केवळ औपचारिकतेपुरत्या मर्यादित राहू नयेत. चहा–बिस्कीट आणि कागदी चर्चेपलीकडे जाऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी यंत्रणा कार्यान्वित झाली पाहिजे. मतदार यादी निर्दोष करणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून निवडणूक व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवण्याची घटनात्मक जबाबदारी आहे.लोकशाहीला घातक ठरणाऱ्या मतदान यादीतील बाबींची गांभीर्याने विचार करून तातडीने दखल घेऊन प्रभावी कार्यवाही करण्यात यावी, आणि लोकशाही वाचवावी अशी मागणी शिवसेना संघटक दीपक निकम यांनी निवडणूक निर्णय अधिकारी प्रांत अधिकारी यांच्याकडे केली आहे.

# महेंद्रशेठ घरत कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक

**उरण । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत मंगळवारी (ता. २४) कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या दर्शनासाठी गेले होते. यावेळी त्यांनी खणा–नारळाने ओटी भरून देवीची पूजा केली. चैत्र नवमीच्या पूर्वसंध्येला घेतलेले दर्शन विलोभनीय असल्याचे महेंद्रशेठ घरत म्हणाले. समाजातील दिनदुबळ्यांना मदत करण्याची मनोकामना पूर्ण करण्याचे बळ लाभू दे, अशी प्रार्थनाही त्यांनी महालक्ष्मीकडे केली. कोल्हापूरची महालक्ष्मी (अंबाबाई) हे महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी एक मुख्य शक्तिपीठ आहे. हे मंदिर प्राचीन करवीर निवासिनीचे आहे. स्थापत्यशैलीचे एक उत्तम उदाहरण म्हणून महालक्ष्मीच्या मंदिराची ख्याती आहे. महालक्ष्मीचे मंदिर हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते,



त्यामुळे महेंद्रशेठ घरत दरवर्षी कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक होतात आणि देवीची मनोभावे पूजा करतात.

# एन.एम.एम.एम.परीक्षेत पिरकोन महाविद्यालयातील मुलींनी मारली बाजी

**पनवेल । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या आर्थिक दुर्बल घटकामध्ये मोडणाऱ्या शाळेय विद्यार्थ्यां साठी एन.एम.एम.एस परीक्षांचे नियोजन केले जाते. उरण पूर्व विभागातील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यालयातून एकूण १५ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते त्यापैकी १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले त्यात १० पैकी ९ मुलींनी बाजी मारली तर मुला पैकी एकच विध्यार्थी उत्तीर्ण झाल्याने विद्यालयात मुलींनीच बाजी मारले असे म्हटले जाते.

उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हे विद्यालय ग्रामीण भागात असून या विद्यालयाने अनेक विद्यार्थी घडविले आहेत. हे विद्यालय नसते तर या भागात अनेकांना शिक्षणाची दारे उघडली नसती. त्यामुळं हे विद्यालय या भागासाठी ठेवा आहे असेच म्हटले



जाते.या विद्यालयाच्या प्राचार्या सौ. ए.ए.पाटील विभाग प्रमुख सौ.एम.एस.पाटील , प्रा.डाढाळे बी.बी., सौ. एस.सी.पाटील, श्री.एस.आर.म्हात्रे , सौ.डी.आर.पाटील, सौ. सी. ए. घरत, सौ. वर्षा पाटील, कु. कल्याणकर एन.बी, पाटील पी.एम सर या सर्व शिक्षकवृंदचे मोलाचं मार्गदर्शन लाभल्यानेच हे यश संपादन करू शकले असे विद्यालयाचे चेअरमन जीवन गावंड तसेच पिरकोन पंचक्रोशीतून विद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ठाण्यात धर्मवीर आनंद दिघे प्रतिष्ठानच्या चैत्र नवरात्रौत्सवात संस्कृतीचा जागर

**संतोष पडवळ । ठाणे**

भक्ती, परंपरा आणि मातृशक्तीचा जल्लोष यांचा त्रिवेणी संगम ठाण्याच्या चैत्र नवरात्रोत्सवात अनुभवयास मिळाला. धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने कोपरी येथील संत तुकाराम महाराज मैदानावर आयोजित चैत्र नवरात्रौत्सवात बुधवारची सायंकाळ भक्तिरस आणि रंगतदार रास दांडियाच्या तालावर अक्षरशः रंगून गेली. भाविकांनी अंबे माँतेच्या गीतांवर संस्कृतीचा जागर केला.राज्याचे उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून सुरू असलेल्या सहस्त्रचंडी हवनात्मक नवकुंडीय महायज्ञाच्या अष्टमी दिनी सहस्त्रचंडी याग आणि सांज आरती पार पडली. या पवित्र सोहळ्यात सौ. लता एकनाथ शिंदे, बिग बॉसच्या घरात कल्ला करणारी ठाणेकर अभिनेत्री जान्हवी किल्लेकर तसेच, अभिनेते मंगेश देसाई यांनी उपस्थिती दर्शवत अंबे मातेची सांज आरती केली. भक्तिमय वातावरणात झालेल्या आरतीने भाविकांच्या मनात श्रद्धेची दीपज्योत प्रज्वलित केली. यानंतर रंगलेल्या रंगाई प्रस्तुत 'रंगीलो रास दांडिया नाईट' च्या रंगतदार पर्वात अंबे माँतेचा गजर करीत अवघी स्त्री शक्ती एकवटली. सौ.लता एकनाथ शिंदे यांनीही रास दांडीयामध्ये सहभाग दर्शवला.प्रारंभी स्थानिक महिलांनी मंगळागौरचे विविध



खेळ सादर करीत प्लास्टिक टाळुन पर्यावरण जपण्याचा मौलिक संदेश दिला. त्यानंतर 'महाराष्ट्राची हास्य जत्रा' फेम शाम बांगर यांच्या उपस्थितीत वादकांच्या सुरेल साथीत महिलावर्गाने रास दांडियाचा फेर धरला. गायक विजय धुरी, के. पौर्णिमा, हरीश ठक्कर आणि उर्मिला धनु यांनी सादर केलेल्या मराठी – हिंदी पारंपरिक गाण्यांसह देवी गीतांनी संपूर्ण परिसर भारावून गेला. अभिनेत्री जान्हवी किल्लेकर हिनेही दांडियात सहभाग घेतल्याने महिलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. तिच्यासोबत दांडिया खेळत सेल्फी घेण्याचा आनंद महिलांनी मनसोक्त लुटला. रास दांडीयाच्या समारोप पर्वात उपमुख्यमंत्री एकनाश शिंदे यांनी सभामंडपात उपस्थिती दर्शवुन कलाकारांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरजे अमित काकडे यांनी अत्यंत रंगतदार पद्धतीने करत उपस्थित महिलांना रास दांडीयाच्या नृत्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या उत्साही शैलीमुळे 'रास दांडीया' खेळात अधिक रंगत आली. या सोहळ्यास महापौर शर्मिला पिंपळोलकर, जयप्रकाश कोटवानी, प्रमोद बनसोडे, राहुल लोंढे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक आणि हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को–ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफिस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)